# मिरा भाईंदर महानगरपालिका
## MIRA-BHAINDAR MUNICIPAL CORPORATION

कार्यालय : स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईदर (प.), ता. जि. ठाणे - ४०१ १०१.

दूरध्वनीः 022-28192828 / 28193028 / 28181183 / 28181353 / 28145985

ईमेलः mbmcho@gmail.com वेबसाईटः www. mbmc.gov.in

मुख्य कार्यालय

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


जा. क्र. मिभा / मनपा /आयुक्त/ ६८/ २०२३-२४ दिनांकः ०८/११/२०२३

## // जाहिर आवाहन //

दि. 10/11/2023 पासून सुरु होणाऱ्या लोकप्रिय दिवाळी सणाच्या उत्सवप्रिय मिरा भाईंदर नगरवासियांना मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे हार्दिक शुभेच्छा. आपल्या शहरात खालावलेली हवेची गुणवत्ता, वाढते ध्वनी प्रदुषण विचारात घेता यावर्षीची दिवाळी पर्यावरणपुरक होण्यासाठी सर्व पातळीवर प्रयत्न सुरु असून नागरिकांचा सहभाग सक्रिय असल्याशिवाय अपेक्षित यश आपणास मिळणार नाही.

या नोटीसद्वारे सर्व नागरिकांना जाहिर आवाहन करण्यात येते की, यावर्षी मा. न्यायालय निर्देश तसेच शासनाच्या आदेशानुसार फटाके फोडण्याची वेळ रात्री 7.00 ते 10.00 निश्चित केली आहे. दिवाळी सणामध्ये मोठ्याप्रमाणात फटाक्यांचा कचरा निर्माण होत असतो. आपल्या इमारती / सोसायटीच्या आवारात निर्माण होणारा फटाक्यांचा कचरा स्वतंत्र डब्यात जमा करून ठेवण्यात यावा. सदर फटाक्यांचा कचरा ओला व सुका या नियमित कचऱ्यामध्ये एकत्रित होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. फटाक्यांचा कचरा उचलण्यासाठी स्वतंत्र वाहनाची व्यवस्था करण्यात आली आहे. त्या वाहनामध्ये फटाक्यांचा कचरा देण्यात यावा.

आपल्या इमारती / सोसायटीमधील निर्माण होणारा फटाक्यांचा कचरा दैनंदिन संकलन ओला व सुका कचऱ्यामध्ये एकत्रित आढळून आल्यास आपल्या इमारती / सोसायटीस घनकचरा अधिनियम 2016 मधील घातक कचऱ्याच्या तरतुदीनुसार रु. 3000/- दंड आकारण्यात येईल. याची नोंद घेण्यात यावी.

**"स्वच्छ सुंदर - मिरा भाईंदर"**

(संजय श्रीपतराव काटकर, भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

D:\Raj Documents\TENDER FILE\jahir Avhan 2023.docx